# महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये आदेश

जा.क्र.आस्था/कळमदरी/विका/क८८/चौकशी/आदेश/२०१७
५४-५६ सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था, नांदगांव
यांचे कार्यालय तालुका- नांदगांव जि नाशिक
दिनांक :२४/ १ /२०१७

वाचावे :-१.महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ मधील तरतुद
२.श्री. के.बी. गुंजाळ, लेखापरिक्षक श्रेणी-२ अधिन द्वितीय विशेष लेखापरीक्षक वर्ग-१ सहकारी संस्था (साखर) नाशिक विनिर्दीष्ठ अहवाल दि.१/४/२०१० ते ३१/३/२०१२ जा.क्र.लेप/कळमदरी वि.का./फेरलेप पि.अ./२/सन २०१७ दि.२१/१/२०१७
३.श्री. के.बी. गुंजाळ, लेखापरिक्षक श्रेणी-२ अधिन द्वितीय विशेष लेखापरीक्षक वर्ग-१ सहकारी संस्था (साखर) नाशिक विनिर्दीष्ठ प्रशासकीय अहवाल दि.१/४/२०१० ते ३१/३/२०१२ जा.क्र.लेप/कळमदरी वि.का./वि.प्रशा.अ/३/२०१७ दि.२१/०१/२०१७ विनिर्दिष्ठ प्रशासकीय अहवाल दि.१/४/२०१२ ते ३१/३/२०१४

सहाय्यक निबंधक सहकारी संस्था ASSTT. REGISTRAR, CO-OPERATIVE SOCIETIES NANDGAON नांदगांव जि. नाशिक

ज्याअर्थी, कळमदरी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. कळमदरी ता. नांदगांव जिल्हा नाशिक या संस्थेची नोंदणी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ अन्वये या कार्यालयाकडे नोंदणी झालेली आहे.

ज्याअर्थी, उपरोक्त संस्थेचे कामकाज महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ तसेच संस्थेने स्विकारलेल्या व या कार्यालयाने मंजुर केलेल्या उपविधीतील तरतुदी अन्वये करणे संस्थेस व संस्थेच्या संचालकाना बंधनकारक आहे.

ज्याअर्थी, वाचावे क्रमांक २ अन्वये श्री. के.बी. गुंजाळ, लेखापरिक्षक श्रेणी-२ अधिन द्वितीय विशेष लेखापरीक्षक वर्ग-१ सहकारी संस्था (साखर) नाशिक यांनी कळमदरी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. कळमदरी ता. नांदगांव जि. नाशिक या संस्थेच्या दि.१/४/२०१० ते ३१/३/२०१२ या कालावधीचा विनिर्दीष्ठ अहवाल या कार्यालयास सादर केलेला आहे.

ज्याअर्थी, वाचावे क्रमांक ३ अन्वये श्री. के.बी. गुंजाळ, लेखापरिक्षक श्रेणी-२ अधिन द्वितीय विशेष लेखापरीक्षक वर्ग-१ सहकारी संस्था (साखर) नाशिक यांनी कळमदरी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. कळमदरी ता.नांदगांव जि. नाशिक या संस्थेचा प्रशासकीय विशेष अहवाल दिनांक १/४/२०१० ते ३१/३/२०१२ या कालावधीचा अहवाल या कार्यालयास सादर करुन लेखापरिक्षणच्या वेळी निदर्शनास आलेल्या अफहाराचा व महत्वाच्या गंभीर मुद्यांचा विनिर्दिष्ठ प्रशासकीय अहवाल पुढील कायदेशीर कार्यवाहीस्तव सादर केला आहे.

ज्याअर्थी, वाचावे क्रमांक १ अन्वये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील कलम ८८ अन्वये एखादया संस्थेची लेखापरिक्षण निरिक्षणच्या प्रारंभाच्या तारखेपुर्वी संस्थेच्या कोणत्याही पैशाचे किंवा मालमत्तेचे अपयोजन केले आहे. किंवा त्यांने असा पैशा किंवा मालमत्ता ठेवून घेतली आहे. किंवा त्याच्या संबंधात तो उत्तरदायी किंवा जबाबदार झाला आहे. किंवा संस्थेच्या बाबतीत कोणतेही अपकार्य किंवा विश्वासघात केल्या बदल तो दोषी झाला आहे. याबाबत निबंधकाचे खात्री होईल तर निबंधकास किंवा त्याबाबत त्याने प्राधिकृत केलेल्या व्यक्तीस अशा व्यक्ती विरुध्द अरोप ठेवला येईल अशी तरतुद करण्यात आलेली आहे.

ज्याअर्थी, वाचावे क्रमांक २ अन्वये या कार्यालयास सादर झालेला प्रशासकीय विशेष अहवालात अपहाराचे मुद्दे व महत्वाचे गंभीर मुद्दे यांचा समावेश असल्याचे निदर्शनास आल्याने सदरच्या प्रशासकीय विशेष अहवालातील गंभीर मुद्दांबाबत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये चौकशी अधिकाऱ्या मार्फत चौकशी करुन त्यांच्यावर उपरोक्त अपहारातील / गैरव्यवहारातील जबाबदारी निश्चित

Scanned by CamScanner

करुन ती त्यांचेकडून वसुल करणे क्रमप्राप्त असल्याची माझी खात्री झाल्याने मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

-: आदेश :-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये मला प्रदान करण्यांत आलेल्या अधिकाराचा वापर करुन मी एस.पी. कांदळकर, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, नांदगांव ता. नांदगांव जि. नाशिक असा आदेश देतो की, कळमदरी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. कळमदरी ता. नांदगांव जि. नाशिक या संस्थेचे श्री. के. बी. गुंजाळ, लेखापरिक्षक श्रेणी-२ अधिन द्वितीय विशेष लेखापरीक्षक वर्ग-१ सहकारी संस्था (साखर) नाशिक यांनी दिनांक १/४/२०१० ते ३१/३/२०१२ या कालाववधीच्या केलेल्या विनिर्दिष्ठ प्रशासकीय अहवालातील सोबत जोडलेल्या परिशिष्ठ अ मधील मुद्यांची चौकशी करणेकामी श्री. एस.के.सोनवणे, सहकार अधिकारी (१) अधिन सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था, नांदगांव ता.नांदगांव जि. नाशिक यांची चौकशी अधिकारी म्हणुन नेमणुक करीत आहे. चौकशी अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये सखोल चौकशी करुन व संबंधीतावर योग्य ती जबाबदारीची रक्कम निश्चित करुन चौकशी अहवाल आवश्यकत्या कागदपत्रांसह या कार्यालयास सादर करावा. सदर चौकशी कामी चौकशी अधिकारी यांना चौकशी फी म्हणून रक्कम रुपये १५,०००/- मंजुर करण्यात येत असून त्याची जबाबदारी संबंधीतावर निश्चित करावी. व चौकशी अधिकारी यांनी या आदेशाच्या तारखे पासून सहा महिन्यात सदरची चौकशी पुर्ण करावी. व चौकशी अहवाल स्वंयस्पष्ट अभिप्रायासह / निश्चि केलेल्या जबाबदारीसह दोन प्रतीत या कार्यालयास सादर करावा.

सदरचा आदेश आज दिनांक २४/०१/२०१७ रोजी माझ्या सही शिक्यानिशी पारित केला असे.

स्थळ :- नांदगांव
दिनांक :-२४/१/२०१७

सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, CO-OPERATIVE SOCIETIES, NANDGAON, नांदगांव, जि. नाशिक

( एस. पी.कांदळकर )
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, नांदगांव जि.नाशिक

**प्रति,**

१.श्री. एस.के.सोनवणे, सहकार अधिकारी (१) अधिन सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था,नांदगांव ता.नांदगांव जि. नाशिक

२/- त्यांना कळविण्यांत येते की, आदेशासोबत जोडलेल्या परिशिष्ट"अ"मधील मुद्दयाची मुद्देनिहाय चौकशी करुन व जाबबदारी निश्चित करुन आवश्यक त्या कागदपत्रासह/ पुराव्यासह अहवाल या कार्यालयास मुदतीत सादर करावा.

२) चेअरमन/सचिव,

कळमदरी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. कळमदरी ता. नांदगांव जि. नाशिक

२/- आपणास आदेशीत करण्यांत येते की, चौकशीकामी चौकशी अधिकारी यांना योग्य ते सहकार्य करावे व यात कसुर होणार नाही याची दक्षता घ्यावी.

<u>प्रत माहितीस्त सविनय सादर.</u>

१. मा.विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक विभाग नाशिक.
२. मा.जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक.
३. मा.जिल्हा विशेष लेखापरिक्षक, सहकारी संस्था, नाशिक.

Scanned by CamScanner